दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार , 18 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 155 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल



# परळीला राज्यस्तरावर गौरवास्पद प्रतिनिधित्व : नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचे मुंबईत शपथग्रहण

## ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ- गव्हर्नमेंट नियामक मंडळावर बिनविरोध निवड संधीचा उपयोग परळीकरांच्या सेवेसाठी करू - नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

परळी वैजनाथ च्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट (ऑल- एलएसजी) या संस्थेच्या महाराष्ट्र राज्य नियामक मंडळावर बिनविरोध निवड झाली आहे. मुंबईतील अंधेरी येथील संस्थेच्या मुख्यालयात शनिवारी (दि. १७ ऑक्टोबर) संस्थेचे अध्यक्ष रणजित चव्हाण यांच्या हस्ते त्यांचा शपथग्रहण समारंभ पार पडला. या निवडीमुळे परळीला राज्यस्तरावर गौरवास्पद प्रतिनिधित्व मिळाले आहे. दरम्यान, या संधीचा उपयोग परळीकरांच्या सेवेसाठी करू अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी दिली आहे.



### संधीचा उपयोग परळीकरांच्या सेवेसाठी करू : नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

परळीचा सर्वांगीण विकास साधणे आणि नागरिकांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरविणे ही आपली जबाबदारी आहे. राज्यस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात काम करण्यासाठी मिळालेल्या संधीचा उपयोग परळीकरांच्या सेवेसाठी करू, अशी भावना शपथ ग्रहणानंतर नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिकांमधून नियामक मंडळाच्या दोन जागांसाठी निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती. या निवडणुकीसाठी चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दोन उमेदवारांनी माघार घेतल्याने परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी आणि अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेच्या नगराध्यक्षा डॉ. अर्चनाताई अरुण अडसड यांची बिनविरोध निवड झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण, नागरी प्रशासनातील क्षमता-वृद्धी, लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, संशोधन आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा प्रसार यासाठी ही संस्था कार्यरत आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, शहरी नियोजन आणि सुशासन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांत स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्याची भूमिका संस्थेची आहे. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे, राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर उर्फ पापा मोदी तसेच परळी नगर परिषदेतील सर्व सदस्यांच्या मार्गदर्शन, सहकार्य व तमाम परळीकरांचे प्रेम आणि विश्वास याबद्दल सौ.धर्माधिकारी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या निवडीचे परळीकरांमधून स्वागत होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# श्री मच्छिंद्रनाथ गड मायंबावर दसरा मेळाव्याचे 18 वे पर्व

## नामवंत संत-महंतांच्या उपस्थितीने सोहळ्याला लाभणार आध्यात्मिक वैभव! मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आमदार सुरेश धस यांचे आवाहन

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील सावरगाव घाट येथील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी दसरा मेळाव्याचे १८ वे वर्ष साजरे करण्यात येणार आहे. नाथ संप्रदायाची परंपरा, श्रद्धा आणि भक्तिभाव जपणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास विविध भागांतील साधुसंत, महंत आणि भाविकांची उपस्थिती लाभणार आहे. या दसरा मेळाव्याला नाथभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गडाचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांनी केले आहे. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा हे नाथ संप्रदायातील भाविकांचे



श्रद्धास्थान असून, या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संतपरंपरेचा वारसा जतन केला जातो. दसरा मेळावा हा या परंपरेतील महत्त्वाचा धार्मिक सोहळा मानला जातो. दरवर्षी या मेळाव्यास नाथभक्त, सेवेकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतात. यंदाही मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर गडावर उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते ११.४५ या वेळेतच श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथील दसरा मेळावा पार पडणार आहे. दसरा मेळावा निर्धारित वेळेतच सुरू होऊन निर्धारित वेळेतच संपणार असल्याचे गडाचे विश्वस्त आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट केले. साधुसंत-महंतांच्या उपस्थितीत होणाऱ्या या धार्मिक सोहळ्याचा नाथभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथील धार्मिक परंपरा अधिक दृढ व्हावी, नाथ संप्रदायातील भक्तांचे स्नेहबंध वृद्धिंगत व्हावेत आणि या श्रद्धास्थानाशी जोडलेल्या सेवेकऱ्यांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नाथभक्तांनी मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून दसरा मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गडाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# परळी तालुक्यात अवैध व डुप्लिकेट गुटखा विक्रीने तरुणाईचे भविष्य धोक्यात ; मंत्री मा .नरहरीजी झिरवळ यांना निवेदन देऊन कारवाई ची मागणी : युवा सेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी तालुक्यात अवैध गुटखा, पान मसाला व डुप्लिकेट गुटख्याच्या वाढत्या विक्रीमुळे तरुण पिढीचे आरोग्य व भविष्य धोक्यात आले आहे. शाळा, महाविद्यालय परिसरात सर्रास गुटखा विक्री सुरू असून बनावट गुटख्यामुळे कर्करोगासारखे गंभीर आजार बळावत आहेत. या पार्श्वभूमीवर युवा सेना जिल्हाप्रमुख सोमेश्वर गित्ते यांनी आज मंत्रालय, मुंबई येथे अन्न व औषध प्रशासन मंत्री मा. नरहरी झिरवाळ साहेब यांची भेट घेऊन तात्काळ कारवाईची मागणी केली. महाराष्ट्रात 2012 पासून गुटखा बंदी असताना देखील परळी शहर व ग्रामीण भागात खुलेआम विक्री सुरू आहे. स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध धंदे फोफावले आहेत. यावर FDA पथकामार्फत विशेष छापेमारी मोहीम राबवून संबंधितांवर कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी



निवेदनातून करण्यात आली.काही ठिकाणी तर जनते मधून अश्या चर्चा समोर येत आहेत जणू परळी त व परळी तालुक्याच्या आसपास काही लोक डुप्लिकेट गुटका स्वतः बनवत आहेत. ही बाब अत्यंत दुर्दैवी असून या कृती मुळे तरुणांची मानसिकता बदलून जाते व व्यसनाधीन होऊन त्यांना त्रास सहन करावा लागतो. या सगळ्या गोष्टी मंत्री मोहदय यांना माहिती दिल्या वर त्यांनी या वर चिंता व्यक्त करत कार्यवाही ची हमी दिली आहे. या मुळे अश्या मानसिकतेच्या लोकांना लवकर च कायद्याचा धाक दिसून येईल.

तसेच दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे श्रावण बाळ योजना. परळी तालुक्यातील अनेक गरजू वृद्ध, निराधार लाभार्थी श्रावण बाळ सेवानिवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. कागदपत्रांची पूर्तता करूनही अनेकांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. या योजनेचा लाभ तात्काळ गरजूंपर्यंत पोहोचवावा व प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. मंत्री महोदयांनी या दोन्ही विषयांवर गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कारवाईचे आदेश देण्याचे आश्वासन दिले, अशी माहिती जिल्हा प्रमुख सोमेश्वर गित्ते यांनी दिली.

# लेखन व संभाषण कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असते : धनंजय अरबुने

**परळी (प्रतिनिधी)**

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात हा जीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत 'विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय कार्यशाळे'मध्ये दुसऱ्या सत्रात बोलत असताना प्रमुख वक्ते धनंजय अरबुने यांनी "लेखन व संभाषण कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असते."असे मत मांडले. या एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविणे,त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे तसेच त्यांना स्पर्धात्मक युगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनविण्याच्या उद्देशाने लेखन व संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व उद्योजकता या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेच्या उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.प्रसाद देशमुख होते तर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे





यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले.यावेळी प्रमुख वक्त्या प्रा.वीणा भांगे यांनी 'सकारात्मक मानसिकता असेल तर शून्यातूनही उद्योगाचे विश्व निर्माण करता येते.' असे मत मांडले.

कार्यशाळेच्या पुढील सत्रात 'लेखन व संभाषण कौशल्य' या विषयावर मा.धनंजय अरबुने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'प्रभावी संवादासाठी योग्य शब्दांची निवड,विचारांची स्पष्ट मांडणी,आत्मविश्वासपूर्ण अभिव्यक्ती आणि लेखनातील अचूकता ' यांचे महत्त्व प्रतिपादित केले.

'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावरील सत्रात मा.तृप्ती तंवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन,आत्मविश्वास,शिस्तवेळेचे नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. दुपारच्या सत्रात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' या विषयावर मा. चंद्रकांत हंकारे यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अभ्यासाचे नियोजन,योग्य संदर्भसाहित्य,नियमित सराव आणि ध्येय निश्चिती यावर विद्यार्थ्यांनी भर देऊन सुव्यवस्थित अभ्यास केला तर यश नक्की मिळते.अशी भूमिका मांडली.या सत्रांच्या अध्यक्षस्थानी अनुक्रमे प्रा. शिवनारायण वाघमारे, प्रा. पवार अशोक आणि प्रा. कोकाट सिद्धेश्वर हे होते. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसोबतच व्यावहारिक जीवनात आवश्यक असणारी कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव होऊन करिअरची दिशा निश्चित करण्यास मदत होते.

कार्यक्रमाचे कार्य क्रमाधिकारी म्हणून प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी तर समन्वयक म्हणून प्रा.डॉ. राजश्री कल्याणकर , प्रा.आचार्य वंदना ,प्रा. डॉ. आर.एल.जोशी, प्रा. डॉ.अरुण चव्हाण,डॉ. विवेकानंद कवडे, श्री.नागभूषण फुलारी , डॉ. वर्षा मुंडे , डॉ. विद्या गुळभिले , डॉ. रंजना शहाणे , डॉ. कचरे संगीता , डॉ. गुट्टे पंढरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# संपादकीय

## ग्रीनलँडसमोरचे आव्हान

ग्रीनलँडवरील अमेरिकेचा वाढता प्रभाव, खनिजसंपत्ती, आर्क्टिकमधील सामरिक स्पर्धा आणि ट्रम्प यांची महत्त्वाकांक्षा या गोष्टींमुळे डेन्मार्क, नाटो व स्थानिक स्वायत्ततेसमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. आर्क्टिक क्षेत्रातील ग्रीनलँड हा भूभाग आज जागतिक सामरिक, आर्थिक आणि भूराजकीय समीकरणांच्या केंद्रस्थानी आला आहे. जगातील सर्वांत मोठे बेट म्हणून ओळखले जाणारे ग्रीनलँड भौगोलिकदृष्ट्या उत्तर अमेरिका आणि युरोप यांच्या दरम्यानचे महत्त्वाचे स्थान व्यापून आहे. या बेटावरील दुर्मीळ खनिजसंपत्ती, वितळणाऱ्या हिमनगांमुळे खुली होत जाणारी नवी सागरी मार्गव्यवस्था आणि उत्तर ध्रुवीय प्रदेशातील वाढती लष्करी स्पर्धा यामुळे ग्रीनलँडकडे अमेरिका, डेन्मार्क, रशिया, चीन आणि इतर पाश्चिमात्य देशांचे लक्ष वेधले गेले आहे. या पार्श्वभूमीवर ग्रीनलँडवर आपला प्रभाव वाढवण्याची अमेरिकेची, विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांची महत्त्वाकांक्षा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

ग्रीनलँड हे डेन्मार्कच्या अधिपत्याखालील स्वायत्त क्षेत्र आहे. स्थानिक सरकारला अनेक अंतर्गत अधिकार असले, तरी संरक्षण आणि परराष्ट्र धोरणासारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये डेन्मार्कची भूमिका निर्णायक आहे. त्यामुळे ग्रीनलँडमध्ये कोणत्याही परकीय शक्तीची लष्करी किंवा धोरणात्मक उपस्थिती वाढणे हे केवळ स्थानिक पातळीवरील प्रकरण राहत नाही; ते थेट डेन्मार्क, नाटो आणि व्यापक पाश्चिमात्य सुरक्षाव्यवस्थेशी जोडले जाते. अमेरिकेने अलीकडील कराराच्या माध्यमातून ग्रीनलँडमधील आपले स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते. या करारात डेन्मार्कचे सार्वभौमत्व मान्य केले गेले असले, तरी प्रत्यक्षात सुरक्षा व्यवस्था, लष्करी उपस्थिती आणि धोरणात्मक नियंत्रण या बाबींमध्ये अमेरिकेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढू शकतो.

ग्रीनलँडबाबत अमेरिकेची उत्सुकता नवी नाही. शीतयुद्धाच्या काळापासून या बेटाला अमेरिकेच्या संरक्षण धोरणात विशेष स्थान आहे. १९५१ मध्ये अमेरिका आणि डेन्मार्क यांच्यात झालेल्या संरक्षण करारानंतर वायव्य ग्रीनलँडमध्ये अमेरिकेचा 'पिटुफिक अंतराळ तळ' उभारण्यात आला. हा तळ पूर्वी 'थुले एअर बेस' या नावाने ओळखला जात होता. आंतरखंडीय क्षेपणास्त्र हल्ल्यांची पूर्वसूचना, क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली, उपग्रह निरीक्षण आणि अंतराळ नियंत्रण या दृष्टीने हा तळ अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. उत्तर ध्रुवीय प्रदेशातून येणाऱ्या संभाव्य क्षेपणास्त्र धोक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रीनलँडचे स्थान अमेरिकेला मोठा सामरिक फायदा देते.

ट्रम्प यांच्या कारकिर्दीत ग्रीनलँडला विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यांनी ग्रीनलँड खरेदी करण्याची कल्पना मांडली होती. ही कल्पना जगभरात उपहासाचा विषय ठरली असली, तरी तिच्यामागील सामरिक विचार गंभीर होता. ग्रीनलँडवरील नियंत्रण किंवा किमान निर्णायक प्रभाव अमेरिकेला आर्क्टिक प्रदेशात रशिया आणि चीनच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. चीनने गेल्या काही वर्षांत आर्क्टिकमध्ये स्वतःला 'नियर आर्क्टिक स्टेट' म्हणून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रशियाकडे तर आर्क्टिक किनारपट्टीवरील मोठा भूभाग आणि लष्करी तळांची साखळी आधीपासून आहे.

डेन्मार्कने मात्र ग्रीनलँडच्या सार्वभौमत्वाच्या प्रश्नावर सतत ठाम भूमिका घेतली आहे. डॅनिश पंतप्रधान मेटे फ्रेडरिकसेन यांनी ट्रम्प यांच्या खरेदी प्रस्तावाला स्पष्ट नकार देत, 'ग्रीनलँड विक्रीसाठी नाही,' असे सांगितले होते. डॅनिश नेतृत्वाने हेही अधोरेखित केले की, ग्रीनलँडच्या भवितव्याचा निर्णय तेथील लोकांच्या संमतीशिवाय होऊ शकत नाही. सार्वभौमत्व, स्वायत्तता आणि स्थानिक लोकांचा अधिकार या तिन्ही मुद्द्यांवर डेन्मार्क आणि ग्रीनलँडमधील नेतृत्वाने अमेरिकेला मर्यादा दाखवून दिल्या. तरीही अमेरिकेची धोरणात्मक रस्सीखेच थांबलेली नाही.

या संपूर्ण प्रश्नाचे दुसरे महत्त्वाचे परिमाण म्हणजे ग्रीनलँडमधील खनिजसंपत्ती. या बेटावर दुर्मीळ खनिजांचे मोठे साठे असल्याचे मानले जाते. मोबाईल फोन, इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी तंत्रज्ञान, संरक्षण उपकरणे, पवनऊर्जा आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांसाठी लागणाऱ्या अनेक खनिजांमध्ये ग्रीनलँडची क्षमता मोठी आहे. चीनने दुर्मीळ खनिजांच्या जागतिक पुरवठा साखळीवर मजबूत पकड निर्माण केली आहे. त्यामुळे अमेरिका आणि युरोपीय देश ग्रीनलँडकडे पर्यायी स्रोत म्हणून पाहत आहेत. सुरक्षा आणि खनिजसंपत्ती या दोन्ही कारणांमुळे ग्रीनलँड पाश्चिमात्य राष्ट्रांसाठी अधिक महत्त्वाचा ठरतो.

अमेरिकेच्या दृष्टीने ग्रीनलँडमध्ये चीन किंवा रशियाला आर्थिक गुंतवणुकीच्या नावाखाली प्रवेश मिळणे हे दीर्घकालीन धोक्याचे ठरू शकते. बंदरे, विमानतळ, खाण प्रकल्प किंवा पायाभूत सुविधा यामध्ये परकीय गुंतवणूक होत असली, तरी तिच्यामागे राजकीय आणि लष्करी हेतू असू शकतात, अशी भीती वॉशिंग्टनमध्ये व्यक्त केली जाते. त्यामुळे 'नाटो'बाहेरील शक्तींना ग्रीनलँडमध्ये लष्करी तळ उभारण्यापासून रोखणे; तसेच संवेदनशील गुंतवणूक मर्यादित ठेवणे, हा अमेरिकेचा स्पष्ट प्रयत्न आहे. या अर्थाने ग्रीनलँडवरील करार हा केवळ डेन्मार्क-अमेरिका संबंधांचा भाग नसून जागतिक शक्तिसंतुलनातील मोठ्या खेळीचा भाग आहे.

तथापि, या प्रक्रियेत स्थानिक ग्रीनलँडवासीयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रीनलँडचा इतिहास वसाहतवादी अनुभवांनी भरलेला आहे. डेन्मार्कशी असलेले संबंधही अनेकदा असमानतेच्या चौकटीत पाहिले जातात. त्यामुळे जर डेन्मार्कच्या जागी अमेरिका नव्या प्रभुत्वशाली शक्तीच्या रूपात उभी राहिली, तर स्थानिक समाजात अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. ग्रीनलँडमधील अनेक नागरिकांना आर्थिक विकास, पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी हव्या आहेत; परंतु त्या बदल्यात राजकीय स्वायत्तता आणि सांस्कृतिक ओळख गमावण्याची त्यांची तयारी नाही. अमेरिकेशी जवळीक वाढली तरी ती स्थानिक लोकांच्या संमतीने आणि त्यांच्या हितसंबंधांच्या चौकटीतच असावी, अशी भावना तेथे प्रबळ आहे. 'नाटो'च्या दृष्टीनेही हा विषय गुंतागुंतीचा आहे. डेन्मार्क आणि अमेरिका हे दोन्ही नाटोचे सदस्य आहेत. एका मित्रराष्ट्राने दुसऱ्या मित्रराष्ट्रावर दबाव टाकणे किंवा लष्करी कारवाईची भाषा करणे, हे नाटोच्या मूलतत्त्वांशी विसंगत ठरते. 'नाटो'ची स्थापना परस्पर संरक्षणाच्या तत्त्वावर झाली असली, तरी आर्क्टिकमध्ये वाढणाऱ्या संसाधन स्पर्धेमुळे मित्रराष्ट्रांमध्येही तणाव निर्माण होऊ शकतो. आज ग्रीनलँड एका निर्णायक वळणावर उभा आहे. एका बाजूला हवामानबदलामुळे खुली होत जाणारी आर्क्टिक सागरी व्यवस्था, दुसऱ्या बाजूला दुर्मीळ खनिजांची जागतिक भूक, तर तिसऱ्या बाजूला रशिया-चीन-अमेरिका यांच्यातील सामरिक स्पर्धा—या तिन्ही घटकांनी ग्रीनलँडला जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले आहे. डेन्मार्कचे सार्वभौमत्व, अमेरिकेची सुरक्षा गरज, 'नाटो'चे हित आणि स्थानिक लोकांची स्वायत्ततेची आकांक्षा यांचा समतोल साधणे अत्यंत कठीण ठरणार आहे. ग्रीनलँडवर अमेरिकेचा वाढता प्रभाव हा एका करारापुरता मर्यादित प्रश्न नाही. तो भविष्यातील आर्क्टिक व्यवस्थेचे स्वरूप ठरवू शकतो. जर हा प्रभाव स्थानिक लोकांच्या इच्छेविरुद्ध वाढला, तर ग्रीनलँडमध्ये नव्या प्रकारच्या असंतोषाला जन्म मिळू शकतो. उलट, स्थानिक स्वायत्ततेचा आदर ठेवून सुरक्षा आणि आर्थिक सहकार्याचा मार्ग निवडला, तर हा प्रदेश पाश्चिमात्य जगासाठी स्थैर्याचा आधार ठरू शकतो. भविष्यात ग्रीनलँडचे राजकीय आणि सामरिक भविष्य कोणते वळण घेते, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून बीडमधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा

## दुष्काळावर मात करण्यासाठी प्रशासनाला तत्पर कार्यवाहीच्या सूचना

■ बीड प्रतिनिधी



पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचा तसेच प्रशासकीय उपाययोजनांचा सविस्तर आढावा राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला.

या बैठकीस आमदार प्रकाश सोळुंके, आमदार धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. सध्या पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक करपले असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. बहुतांश पंचनामे पूर्ण होत आले असून अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पीक विमा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणि अचूकता राखण्याचे निर्देश संबंधित कृषी व महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दुष्काळ आणि टंचाईच्या काळात नागरिकांनी अनावश्यक खर्च टाळावा, लग्न आणि वाढदिवसांवरील खर्च टाळावा तसेच सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करावे, असे आवाहन केले. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून सध्या सुरू असलेल्या पाण्याच्या टँकर्सवर जीपीएस (GPS) प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यात सध्या २२५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पिण्यायोग्य पाण्याचा वापर कोणत्याही परिस्थितीत बांधकामासाठी करू नये आणि पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय जलस्त्रोतांचे पुनर्भरण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि विहिरींची दुरुस्ती यांसारखी जलसंवर्धनाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केल्या. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच पूर्वनियोजन करावे आणि शेतकऱ्यांना मुरघास, हायड्रोपोनिक्स तसेच अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे, असे बैठकीत सांगण्यात आले. वीबी-जी रामजी योजनेअंतर्गत रोजगार हमीची कामे जलसंवर्धनाशी जोडून प्रभावीपणे राबवावीत, जेणेकरून ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजुरांना स्थानिक पातळीवरच हक्काचा रोजगार उपलब्ध होईल आणि त्यांच्यावर स्थलांतराची वेळ येणार नाही. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयी थांबून नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, तसेच शेतकऱ्यांशी संवाद वाढवून त्यांचे समुपदेशन करावे आणि त्यांना मानसिक आधार द्यावा, अशा सूचना देण्यात आल्या. पाणी, चारा आणि रोजगारनिर्मिती या सर्व बाबींवर समन्वयाने काम करून नागरिकांना तातडीने दिलासा देण्यासाठी प्रभावी नियोजन करावे, असेही आढावा बैठकीत स्पष्ट करण्यात आले. वाढत्या दुष्काळी संकटात शासन आणि प्रशासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविल्या जात आहेत. शेतकरी बांधवांना या नैसर्गिक संकटातून सुखरूप बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना तातडीने सावरण्यासाठी राज्य शासन सर्व स्तरांवर उपाययोजना करत असून प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या.



# बुद्धाच्या विचारात समता ,करुणा आणि मैत्रीभाव-आनंद तूपसमुद्रे

## औष्णिक विद्युत केंद्राचे कल्याण अधिकारी शरद राठोड यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहन संपन्न

■ परळी/ प्रतिनिधी

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या शक्ती कुंज वसाहतीतील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला.सकाळी कल्याण अधिकारी शरद राठोड यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहन करण्यात आले. तर सायंकाळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता शीलरत्न मेश्राम हे होते तर प्रमुख उपस्थितीत कार्यकारी अभियंता पी एम मगरे, काळे साहेब, मंचावर उपस्थित होते. प्रवोधनपर भाषण व प्रवचन आनंद तूपसमुद्रे यांनी बुद्धाच्या विचारात समता ,करुणा आणि मैत्रीभाव असल्यामुळे जगाला आजही विज्ञानवादी बुद्धाचा विचारच सातारू शकतो असे ते म्हणाले. कपिल कांबळे, विशाल थोरात, संघरक्षित मस्के, यशपाल मुंडे,कार्यक्रमाचे संचलन मागासवर्गीय संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष बी एल वडमारे यांनी केलं तर आभार प्रदीप चव्हाण यांनी व्यक्त केले.यावेळी

शक्तीकुंज वसाहतीतील अधिकारी, अभियंते, कर्मचारी, तंत्रज्ञ व सर्व रहिवाशांना उपस्थित होते. सामूहिक बुद्धवंदना झाल्यानंतर स्नेहभोजन स्वाद घेतला.

# जिल्हाधिकारी आणि शाळकरी मुलांच्या दिलखुलास गप्पा: बीडच्या उज्ज्वल भविष्याची एक सकारात्मक नांदी

■ बीड प्रतिनिधी



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन नुकतेच एका अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक कार्यक्रमाने गजबजून गेले होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी जिल्ह्यात 'कलेक्टरशी गप्पा' हा एक अनोखा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोतन (तालुका पाटोदा) येथील ३० शाळकरी मुलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी शिला मिसाळ सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकृष्ण इघारे, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी जीवन राजपूत उपशिक्षणाधिकारी सय्यद अंजुम, विस्तार अधिकारी श्री.पल्लेवाड, शिक्षक राहुल डोंगर उपस्थित होत्या. या संवादातून प्रशासकीय अधिकारी आणि सामान्य विद्यार्थी यांच्यातील दरी कमी होऊन एक अतिशय सकारात्मक ऊर्जा निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

### अपयश हीच यशाची पहिली पायरी: जिल्हाधिकाऱ्यांचा प्रवास

या गप्पागोष्टींमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतःचा जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. लहानपणी आयएएस (IAS) होण्याचे आपले कोणतेही स्वप्न नव्हते, असे त्यांनी प्रांजळपणे सांगितले. २०१० मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर त्यांनी यूपीएससीची (UPSC) तयारी सुरू केली. पहिल्या प्रयत्नात अपेक्षित यश मिळाले नाही, परंतु तरीही त्यांनी जिद्द सोडली नाही. सुरुवातीला त्यांची भारतीय महसूल सेवेत (IRS - कस्टम्स आणि जीएसटी) निवड झाली आणि त्यानंतरच्या प्रयत्नात ते आयएएस झाले. "कोणतीही गोष्ट पहिल्या प्रयत्नात मिळेलच असे नाही, त्यामुळे नेहमी दुसरा पर्याय (Plan B) तयार ठेवावा आणि सातत्याने प्रयत्न करत राहावे," असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### बीडचे भविष्य तुमच्याच हाती!

जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास जगताना म्हणाले की. "तुम्हीच बीडचे भविष्य आहात, त्यामुळे बीडचा विकास आणि सकारात्मक बदल तुमच्यावरच अवलंबून आहे," अशी प्रेरणा त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत; मग ते प्रशासकीय अधिकारी होण्याचे असो, डॉक्टर होण्याचे असो, व्यवसाय करण्याचे असो किंवा नासा (NASA) आणि इस्रोसारख्या (ISRO) संस्थांमध्ये जाण्याचे असो. यश मिळवण्यासाठी आत्मविश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे, हे त्यांनी अधोरेखित केले.

### दुष्काळ, शेती आणि पर्यावरण: मुलांचे अभ्यासपूर्ण प्रश्न

या गप्पांमध्ये विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी सर्वांनाच थक्क केले. बीडमधील दुष्काळ आणि शेतीच्या समस्यांवर मुलांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना प्रश्न विचारले. यावर उत्तर देताना जिल्हाधिकाऱ्यांनी एल निनो (El Nino) प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कसे कमी झाले आहे हे समजावून सांगितले. तसेच, कमी पाण्यात आणि कमी वेळेत येणाऱ्या सोयाबीन पिकाकडे शेतकऱ्यांचा कल का वाढला आहे, यावरही चर्चा केली. जनावरांच्या चाऱ्याची टंचाई दूर करण्यासाठी हायड्रोपोनिक्स (Hydroponics) आणि सुका चारा (Dry fodder) यांसारखे आधुनिक पर्याय कसे वापरता येतील, याची माहिती त्यांनी दिली. त्याचबरोबर रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देत, "पुढच्या पावसाळ्यात प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत," असे आवाहन त्यांनी केले.

### विकासाची नवी स्वप्ने आणि शिस्त

बीड जिल्ह्याच्या विकासाबद्दल बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, बीडमध्ये रेल्वे सेवा सुरू झाली. आहे आणि विद्यार्थ्यांसाठी एक तारांगण (Planetarium) देखील उभारले जात आहे. याचबरोबर त्यांनी नागरिकत्वाची जबाबदारी आणि शिस्तीचे महत्त्व मुलांना समजावून सांगितले. ट्रॅफिक नियमांचे पालन करणे, हेल्मेट वापरणे या सवयी लहानपणापासूनच कशा अंगीकारल्या पाहिजेत, यासाठी त्यांनी केरळ आणि इतर देशांतील उदाहरणे दिली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

दैनिक **अतुल्य महाराष्ट्र**

बीड, रविवार, 18 ऑक्टोबर 2026









# ना. पंकजाताई मुंडे श्रीक्षेत्र माहूरगडावर ; रेणुकामातेचे घेतले दर्शन

## देवस्थान संस्थानच्या वतीनं जोरदार स्वागत

**परळी वैजनाथ | राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज देवीच्या साडे तीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र माहूरगडावर जाऊन रेणुकामातेचे दर्शन घेतले. संस्थानच्या वतीनं यावेळी त्यांचं स्वागत करण्यात आलं. जालना जिल्ह्याची दुष्काळ आढावा बैठक आटोपून ना. पंकजाताई मुंडे दुपारी श्रीक्षेत्र माहूरकडे रवाना झाल्या. सायंकाळी त्यांनी व ॲड यशःश्रीताई मुंडे यांनी माहूरगडावरील श्री रेणुकामातेचे दर्शन घेतले, यावेळी आ. श्वेताताई महाले यांनी देखील त्यांचेसोबत दर्शन घेतले. यावेळी संस्थानच्या वतीने त्यांचं हर्षोल्हासात स्वागत करण्यात आलं. तत्पूर्वी माहूर शहरात आगमन होताच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचं जंगी स्वागत केलं.**

# आ. रमेशआप्पा कराड; युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांचे लातूर जिल्हा बँक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

**लातूर |** लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीसाठी महायुती सहकार पॅनलच्या माध्यमातून लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड आणि भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांचे उमेदवारी अर्ज शुक्रवारी दाखल करण्यात आले आहेत. यावेळी लातूर ग्रामीण मतदार संघातील भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने होते.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गट महायुतीच्या वतीने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचा भटक्या विमुक्त जाती जमाती नागरिकांचा मागास प्रवर्ग गटातून सूचक जयश्री संजय जाधव अनुमोदक रवी धनराज जाधव आणि नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था या गटातून सूचक गोपाळ भानुदास पडले अनुमोदक सुरेश शेषराव कटके असे दोन अर्ज दाखल केले आहेत.

भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी भटक्या विमुक्त जाती जमाती नागरिकांचा मागास प्रवर्ग गटातून सूचक पुनम विशाल सोट अनुमोदक गोपाळ भानुदास पडीले तर नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था गटातून सूचक भगवान विठ्ठल देवकते अनुमोदक अंकुश भागुराम केंद्रे आणि सूचक रेखा भगवान तरडे अनुमोदक धनंजय माणिकराव कुलकर्णी असे एकूण ऋषिकेश कराड यांनी तीन अर्ज दाखल केले आहेत.



आ. रमेशआप्पा कराड आणि ऋषिकेशदादा कराड यांचे उमेदवारी अर्ज दाखल करताना अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह जिल्हाभरातील महायुतीचे नेते आणि लातूर ग्रामीण मतदार संघातील विक्रमकाका शिंदे, महादेव साळुंके, भागवत सोट, महेंद्र गोडभरले, बन्सीभाऊ भिसे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, पद्माकर चिंचोलकर, अनिल भिसे, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, राजकिरण साठे, गोपाळ पाटील, विश्वास कावळे, दीपक वांगस्कर, अशोक राठोड, विजय गंभीरे, बाबा भिसे, विजय काळे, वसंत करमूडे, लक्ष्मण यादव, बापूराव चामले, आदिनाथ मुळे, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, संजय ठाकूर, किरण मुंडे, उत्तम चव्हाण, दिनकर राठोड, ओम चव्हाण, राज जाधव, नारायण राठोड, रमाकांत फुलारी, ज्ञानेश्वर जुगल, लक्ष्मण खलंग्रे, सुरेश बुड्डे, अशोक सावंत, शरद शिंदे, श्रीमंत नागरगोजे, वैभव मगर यांच्यासह अनेक जण होते. इच्छुक उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मोठी गर्दी केली होती.

# तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवात प्रा. प्रविण फुटके यांच्या हस्ते सपत्नीक आरती

## चणिया-चोली वेशभूषेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग





**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे यंदा पाचवे पुष्प असून, शुक्रवारी सहाव्या माळेनिमित्त महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नांदेड विभागाचे उपाध्यक्ष तथा पत्रकार प्रा. प्रविण फुटके यांच्या हस्ते सपत्नीक देवीची आरती करण्यात आली. तसेच श्री शनी देवाची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. यावेळी प्रा. प्रविण फुटके व त्यांच्या पत्नी सौ. संजीवनी प्रविण फुटके यांचा तेली समाज दांडिया उत्सव समितीच्या वतीने पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवात शुक्रवारी महिलांसाठी चणिया-चोली वेशभूषा ठेवण्यात आली होती. या आकर्षक वेशभूषेमुळे महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी दांडिया नृत्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवित उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. भक्तिमय वातावरणात झालेल्या आरतीनंतर दांडियाच्या तालावर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास मल्लिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, छगन आप्पा क्षीरसागर, अशोक बेंडे, चंद्रशेखर फुटके, ओंकार सोनटक्के, अजय सोनटक्के, शिवशंकर जठार, विनोद आळणे, शिवराज सोनटक्के, सोमनाथ क्षीरसागर, महारुद्र विटेकर यांच्यासह तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष तथा युवानेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतीश फुटके, राहुल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दीपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, गजानन बेंडे, प्रदीप पिंपळे, महेंद्र अन्नपूर्णे, अमोल क्षीरसागर, योगेश व्यवहारे आणि प्रसाद जठार यांच्यासह तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले लोकप्रतिनिधी व अधिकारी!

## दुष्काळग्रस्त परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी; पीक नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना

**जव्हार (वा.) :**

महाराष्ट्रात अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि तलासरी या तालुक्यांना सुरुवातीला दुष्काळग्रस्त यादीतून वगळण्यात आले होते. मात्र, त्यानंतरच्या यादीत या तालुक्यांचा समावेश झाल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर मोखाडा तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या लोकप्रतिनिधींनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी केली. तसेच पीक नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याची कार्यवाही हाती घेतल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोखाडा तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळसदृश परिस्थितीचा मोठा फटका बसत असून, शेतीच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा, यासाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. यावेळी नुकसानीचे योग्य व वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्याचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी भारतीय जनता पार्टीचे पालघर जिल्हा उपाध्यक्ष संतोष चोथे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, मोखाड्याचे तहसीलदार रोहन शिंदे, तालुका कृषी अधिकारी अमोल जोशी यांच्यासह महसूल व कृषी विभागातील अधिकारी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या शेतीच्या नुकसानीची पाहणी करण्यात आली. पंचनामे करताना कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, तसेच प्रत्यक्ष नुकसानीची योग्य नोंद घेण्यात यावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

“शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांवर संकट आले असताना आम्ही त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी योग्य पद्धतीने पंचनामे करून वरिष्ठ स्तरावर अहवाल सादर करावा,” असे प्रतिपादन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष चोथे यांनी यावेळी केले. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. आता या पंचनाम्यांच्या आधारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून कितपत मदत मिळते, याकडे तालुक्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 18 ऑक्टोबर 2026
Last page




## शितल शिंदे ठरल्या नारीशक्तीच्या होम मिनिस्टर

### सौ.आळसे,सौ.हरंगुळे,सौ.चौंडे बक्षिसाच्या मानकरी

**परळी(प्रतिनिधी)**

परळी शहरातील गुरुलिंग स्वामी मंदिर संस्थान,बेलवाडी येथे सुरु असलेल्या सौ.श्रध्दा हालगे-फुलारी आयोजित नारीशक्ती दांडीया महोत्सवात शुक्रवारी खेळ पैठणीचा स्पर्धा पार पडल्या.यात सौ.शितल शांतिनाथ शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकावत नारीशक्ती होम मिनिस्टर चा मान पटकावला.

नवरात्रीच्या काळात परळी शहरातील बेलवाडी येथे सौ.श्रध्दा हालगे-फुलारी या आरोही स्टाईल स्टुडीओच्या माध्यमातुन दि.१२ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत दांडिया महोत्सवाचे आयोजन केले असुन यामध्ये शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर रोजी खेळ पैठणीचा ही स्पर्धा पार पडली. यामध्ये महिलांनी उत्फुर्तपणे सहभाग नोंदवला.महिलांमध्ये लोकप्रिय असलेल्या खेळांमध्ये कला दाखवत सौ.शितल शांतिनाथ शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर सौ.अंबिका बुवाजी आळसे या द्वितिय,सौ. अर्चना काशिनाथ हरंगुळे तृतीय व सौ.मालाश्री उमेश चौंडे यांनी चतुर्थ क्रमांकांच्या मानकरी ठरल्या.होम मिनिस्टर स्पर्धेतील या विजेत्या महिला स्पर्धकांना,आकर्षक पैठणी,आकर्षक साडी,आकर्षक गिफ्ट हॅम्पर अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. नारीशक्ती दांडिया महोत्सवात सोमवार दि.१९ ऑक्टोबर रोजी फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार असुन या स्पर्धांमध्ये महिलांनी आधुनिक व पारंपारिक लुक परिधान करुन सहभागी व्हावे असे आवाहन संयोजिका सौ.श्रध्दा हालगे-फुलारी यांनी केले आहे.




## लोकशाही पत्रकार महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी किशोर दादा पवार यांची सर्वानुमते निवड

**मुंबई | प्रतिनिधी**

लोकशाही पत्रकार महासंघ, भारताच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी मा. किशोर पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मान्यतेने राष्ट्रीय निवड समिती तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीने त्यांच्या नावाला संयुक्तपणे एकमताने मंजुरी दिली. या निवडीमुळे महाराष्ट्रातील पत्रकारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित लढा उभारणे आणि राज्यभर महासंघाचे मजबूत संघटनात्मक जाळे निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी किशोर पवार यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या निवडीकडे केवळ एका पदावरील नियुक्ती म्हणून नव्हे, तर महाराष्ट्रातील पत्रकारांच्या प्रश्नांना संघटित व्यासपीठ मिळवून देण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

या निवड प्रक्रियेत लोकशाही पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्यकारिणीचे प्रमुख सदस्य तथा मुंबईचे निवृत्त न्यायाधीश डॉ. संतोषकुमार जयस्वाल, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय महामंत्री टी. माधव, राष्ट्रीय संघटनमंत्री ज्ञानेश्वरजी बुधवंत, राष्ट्रीय कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे वकील रमाकांत पाटील, तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीचे सदस्य डॉ. अनिलजी पाटील, सनम पाटील,शेखर पाटील साहेब, हलीमाताई शेख, पंचशीला कांबळे आणि रेणुका ताई जयस्वाल यांनी किशोर पवार यांच्या नावाला सर्वानुमते मंजुरी दिली. त्यानंतर त्यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदावरील निवडीची घोषणा करण्यात आली.

किशोर पवार गेल्या सहा ते सात वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून, जनहिताचे प्रश्न, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, ग्रामीण भागातील अडचणी, सामाजिक विषय तसेच शासन-प्रशासनाशी संबंधित प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे आणि संबंधित यंत्रणांपर्यंत त्यांचा आवाज पोहोचविणे, या दिशेने त्यांनी काम केले आहे. राज्यातील विविध भागांतील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी



आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांशी त्यांचे संपर्कजाळे निर्माण झाले आहे. या अनुभवाचा उपयोग करून पत्रकारितेतील प्रश्नांना व्यापक स्वरूप देणे आणि पत्रकारांना संघटित करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे, हे त्यांच्या आगामी कार्यकाळातील महत्त्वाचे उद्दिष्ट राहणार आहे.

आजच्या काळात पत्रकारांना वृत्तसंकलन करताना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. ग्रामीण आणि दुर्गम भागातील पत्रकारांना मूलभूत सुविधा, व्यावसायिक सुरक्षितता, कायदेशीर मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि प्रशासकीय स्तरावर आपल्या समस्या मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागातील पत्रकार, लहान वृत्तपत्रे, डिजिटल माध्यमे तसेच स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून किशोर दादा पवार पत्रकारांचे प्रश्न संघटितपणे मांडण्यावर भर देणार आहेत. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी पाठपुरावा करणे, अडचणींचे संकलन करून त्या संबंधित विभागांपर्यंत पोहोचविणे, आवश्यकतेनुसार कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षिततेसाठी संस्थात्मक पातळीवर काम करणे, यांना त्यांच्या कार्यात प्राधान्य दिले जाणार आहे.

लोकशाही पत्रकार महासंघाचे संघटन राज्याच्या प्रत्येक विभागात, जिल्ह्यात, तालुक्यात आणि ग्रामीण भागात अधिक सक्षम करण्याचा निर्धार किशोर पवार यांनी व्यक्त केला आहे. केवळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांपुरते संघटन मर्यादित न ठेवता, प्रत्येक पदाधिकाऱ्याने पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष काम करावे, स्थानिक पातळीवरील समस्या प्रदेश स्तरापर्यंत पोहोचाव्यात आणि त्या सोडविण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा व्हावा, अशी कार्यपद्धती विकसित करण्यावर त्यांचा भर राहणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर कार्यक्षम कार्यकारिणी उभारणे, नियमित बैठका घेणे, पत्रकारांच्या प्रश्नांचा अहवाल तयार करणे, संघटनात्मक समन्वय वाढविणे आणि प्रत्येक भागातील पत्रकारांना महासंघाशी जोडणे, या माध्यमातून राज्यव्यापी संघटन अधिक गतिमान करण्याचे नियोजन आहे.

पत्रकारांना शासनाच्या विविध विभागांशी संबंधित कामकाज, नियम, सुविधा आणि उपलब्ध योजनांची माहिती वेळेवर मिळणे महत्त्वाचे आहे. अनेकदा माहितीअभावी किंवा योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे पात्र व्यक्ती योजनांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या बाबतीतही शासकीय योजना, लागू असलेल्या सवलती, विमा संरक्षण, आरोग्यविषयक सुविधा आणि इतर पात्रताधारित लाभांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधणे, अधिकृत योजनांची माहिती संकलित करून जिल्हा व तालुका स्तरावरील पत्रकारांपर्यंत पोहोचविणे, पात्र पत्रकारांना अर्ज प्रक्रिया समजावून सांगणे आणि त्यांच्या अडचणींचा पाठपुरावा करणे, या दिशेने महासंघ काम करणार आहे. कोणत्याही योजनेचा लाभ संबंधित नियम व पात्रतेनुसार मिळावा, यासाठी पत्रकारांना योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

लोकशाही पत्रकार महासंघ हा पत्रकार आणि शासन-प्रशासन यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून काम करेल. पत्रकारांच्या समस्या केवळ ऐकून न घेता त्या समजून घेणे, त्यांचे दस्तऐवजीकरण करणे, संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे आणि न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट असेल, अशी भूमिका किशोर दादा पवार यांनी व्यक्त केली.

पत्रकारितेबरोबरच किशोर पवार हे अनेक वर्षांपासून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत. विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समाजातील विविध घटकांशी समन्वय साधण्याचा अनुभव मिळविला आहे. संघटन उभारणी, लोकांशी संपर्क, प्रश्नांचे संकलन आणि संबंधित स्तरावर पाठपुरावा या बाबींचा अनुभव त्यांच्या नव्या जबाबदारीत उपयुक्त ठरणार आहे. पत्रकार संघटनेचे काम करताना पत्रकारितेची स्वतंत्र ओळख, व्यावसायिक प्रतिष्ठा आणि संघटनेची विश्वासार्हता जपणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही पत्रकाराला त्याच्या न्याय्य प्रश्नांसाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच संघटनेचे काम पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक पद्धतीने व्हावे, यासाठी प्रयत्नशील राहण्याचा त्यांचा मानस आहे.

किशोर पवार हे सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्याच्या दिशेने काम केले जात आहे. महिला सक्षमीकरण, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी, सामाजिक मदत आणि जनहिताच्या उपक्रमांवर संस्थेचा भर आहे. ग्रामीण भागातील महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि गरजू नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती मिळवून देणे, या क्षेत्रांत सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवून आणण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. पत्रकारिता, संघटनात्मक नेतृत्व आणि सामाजिक कार्य या तिन्ही क्षेत्रांतील अनुभवाचा समन्वय साधत समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यभरातील पत्रकारांना एकत्र आणणे, संघटनेत सक्रिय सहभाग वाढविणे, पत्रकारांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणे आणि महासंघाला विश्वासार्ह, कार्यक्षम व परिणामकारक व्यासपीठ म्हणून विकसित करणे, हे किशोर दादा पवार यांच्यासमोरील प्रमुख आव्हान असेल. पत्रकारांचे हक्क, सन्मान, सुरक्षितता, व्यावसायिक प्रश्न आणि शासकीय योजनांबाबत योग्य माहिती या मुद्द्यांवर नियोजनबद्ध काम केल्यास राज्यातील पत्रकारांना संघटित ताकद मिळू शकते. या उद्दिष्टांसाठी राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटी, जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांच्या सहकार्याने व्यापक उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

किशोर पवार यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदावरील निवडीमुळे लोकशाही पत्रकार महासंघाच्या राज्यव्यापी विस्ताराला नवी दिशा मिळेल, तसेच पत्रकारांच्या प्रश्नांना अधिक संघटित आणि प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.